बीड जिल्हा अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर पध्दतीने, आर. सी. सी. <u>पध्दतीने बांधकाम करण्यास मान्यता देणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१६/प्र.क्र.३०१/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ६ एप्रिल, २०१८

संदर्भ :- १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२००८/प्र.क्र.१७३/का.६, दिनांक १५ जानेवारी, २०१०
२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१३/प्र.क्र.१५८/का.६, दिनांक २९ जानेवारी, २०१४

<u>प्रस्तावना</u> :-

महिला व बाल विकास विभागामार्फत राज्यात अंगणवाडया चालविण्यात येतात. अंगणवाडयांच्या इमारती बांधण्यासाठी दिनांक १५ जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयानुसार आराखडा निश्चित करण्यात आला असून बिगर आदिवासी क्षेत्रासाठी एक अंगणवाडी बांधकामासाठी रुपये ६.०० लाख व आदिवासी क्षेत्रासाठी रुपये ६.६० लाख इतका निधी मंजूर करण्यात येतो. बीड जिल्हयासाठी अंगणवाडी बांधकामासाठी प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर अंगणवाडी बांधकामाची परवानगी देण्याबाबत विधानमंडळात प्रश्न/ चर्चा उपस्थित करण्यात आली होती. अंगणवाडी केंद्राची बांधकामे प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर पध्दतीने बांधण्यासाठी प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर अंगणवाडी बांधकामाचा नमुना आराखडा (Type Plan) शासन स्तरावर अद्याप अंतिम झालेला नाही. तथापि, प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर अंगणवाडी बांधकाम करण्याची बीड जिल्हा परिषदेची मागणी होती. दिनांक १५ जानेवारी, २०१० च्या (Type Plan) नुसार बीड जिल्हयातील अंगणवाडी केंद्राची बांधकामे प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर पध्दतीने करण्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u> :-

अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी बीड जिल्हयासाठी विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधीमधून अंगणवाडयांची बांधकामे दिनांक १५ जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयानुसार आर. सी. सी. पध्दतीने करण्यास किंवा दिनांक २९ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयानुसार मंजूर आर्थिक मर्यादेत ई-निविदा काढून प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर पध्दतीने बांधकाम करण्यास शासन मंजूरी देत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०६१५४२४८९१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.04.06 16:56:01 +05'30'

(ला. रा. गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
४) जिल्हा कोषागार अधिकारी, बीड
५) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे
६) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई
७) जिल्हाधिकारी, बीड
८) मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) बीड
९) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बीड
१०) महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हा परिषद) बीड
११) बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/नागरी/आदिवासी) प्रकल्प बीड
१२) वित्त विभाग (व्यय-६, अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
१३) नियोजन विभाग(का.१४७२), मंत्रालय, मुंबई
१४) निवड नस्ती-का.६